131

**RNI No. MAHBIL/2009/37831**
**Reg. No. MH/MR/South-339/2011-13**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक ८२] मंगळवार, ऑक्टोबर ८, २०१३/आश्विन १६, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १३६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ ऑक्टोबर २०१३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५.**

क्रमांक एसएससी-२०१२/(११२/१२)/उमाशि-२.—महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) याचे कलम ३६ तसेच ३७ चे पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य माध्यामिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम, १९७७ यामध्ये, याद्वारे पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे,–

१. या विनियमांस महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे (सुधारणा) विनियम, २०१३ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम, १९७७ विनियम ५९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य विनियम " असा करण्यात आला आहे) याच्या पोट-नियम (४) ला खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

" (४) ऑक्टोबर, २०१० मध्ये प्रविष्ट झालेल्या व त्यापुढील आयोजित होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची संपादणूक सुधारित विनियम ५६, ५८ आणि ५९ या विनियमाप्रमाणे सर्वोत्तम पाच निकषानुसार निश्चित करण्यात येईल. "

३. मुख्य नियमातील विनियम ७९ च्या पोट-नियम (६अ) व (६ब) ला खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येतील:–

" ६(अ) भारतीय माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र (आय.सी.एस.ई.) परीक्षा उत्तीर्ण झालेले आणि ज्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्षात प्रवेश घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी पुढीलप्रमाणे कोणताही एक पर्याय निवडणे बंधनकारक राहील :—

**पर्याय-१.—** आय.सी.एस.ई. ची भारतीय माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्षातील प्रवेशासाठी " सर्वोत्तम पाच " च्या निकषाचा पर्याय

(जसा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांची संपादणूक करण्यास लागू केला आहे) लावता येईल. आय.सी.एस.ई. च्या विद्यार्थांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी या पर्यायाची निवड केल्यावर सर्वोत्तम पाच चा निकष (आय.सी.एस.ई. च्या अभ्यासक्रमानुसार) फक्त गट १ व २ मधील विषयांसाठी मर्यादित राहील. गट ३ मधील विषयांसाठी हा पर्याय लागू होणार नाही.

**पर्याय-२.—** जर आय.सी.एस.ई. च्या विद्यार्थांना गट ३ अंतर्गत सर्व सात विषयांच्या सरासरी गुणांचा पर्याय घेऊन प्रथम वर्षासाठी प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्याला सर्वोत्तम पाचचा निकष लावला जाणार नाही. अशा प्रकरणी त्याच्या शेकडा गुणांची गणना सर्व सात विषयांच्या सरासरी गुणांच्या आधारे केली जाईल.

६(ब) उपरोक्त प्रर्याय १ किंवा पर्याय २ घेणारे विद्यार्थी मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्षात प्रवेश देण्यास पात्र समजले जातील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश ठुबे,
शासनाचे सहसचिव.

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Mantralaya Annexe Building, Mumbai 400 032, dated the 8th October 2013.

*NOTIFICATION*

Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965.

No. SSC-2012/(112/12)/HSE-2.— In exercise of the powers conferred by sub-section (2) of section 37 read with section 36 of the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965), the Government of Maharashtra, after consultation with the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, is hereby amends the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Regulations, 1977 as follows, namely :—

**1.** These regulations may be called the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards (Amendment) Regulations, 2013.

**2.** In regulation 59 of the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Regulations, 1977 (hereinafter referred to as the " the principle Regulations "), for clause (4), the following clause shall be substituted, namely :—

" (4) The performance of the candidates who appeared for the Secondary School Certificate Examination held in October, 2010 and those appearing for subsequent examination, shall be evaluated in accordance with the Best Five Criteria, contained in regulation 56, 58 and 59."

**3.** In regulation 79 of the principle Regulations, for clauses (6A) and (6B), the following clauses shall be substituted, namely :—

"(6A) The candidates who have passed the Indian Certificate of Secondary Education (I.C.S.E.) Examination and who are desirous of seeking admission to the First Year of Junior College affiliated to the State Board shall be entitled to exercise any of the following options for being admitted, namely :—

*Option I.*—The Best Five Criteria (as applicable to the students appearing for the Secondary School Certificate Examination of the State Board for evaluating their performance for the Secondary School Certificate Examination) shall be made applicable to the students passing the Indian Certificate of Secondary Education Examination, if such students exercise of the option of applicability of Best Five Criteria for their admission to the First Year Junior College affiliated to the State Board. The Best Five Criteria upon the exercise of this option by the Indian Certificate of Secondary Education candidate for admission to First Year Junior College shall be restricted to the subjects in Group I and II only (as per the Indian Certificate of Secondary Education curriculum) and not to Group III subjects.

*Option II.*—If a student of Indian Certificate of Secondary Education seeking admission to First Year Junior College desires to take the advantage of Group III subjects, he shall have an option to proceed on the basis of average of all the seven subjects without applying the Best Five Criteria. In such a case, upon exercise of such option, his percentage shall be calculated by arriving at the average of all the seven subjects.

6(B) The Students availing above Option I or Option II shall be eligible for admission to the First Year of Junior college affiliated to the Board."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH THUBE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.